पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

***दिनांक- ०१/०३/२०२१***

| पो.स्टेशन/अप.क्र./कलम | घटनास्थळ/घटना ता.वेळ | फिर्यादी व आरोपीतांचे नाव |
|---|---|---|
| आरमोरी60/2021कलम 11 (1) ड प्राण्यांना निर्दयतने वागणुक प्रति.अधि. 5 (अ)1,9ठ महा.प्राणी संरक्षण अधि. | मौजा वैरागड शिवार ते ठाणेगाव रोड दर. ते गोठणगाव गोशाळा<br>**घटना ता. वेळ :-**<br>दिनांक 28.02.2021 चे 02.45 ते 08.00वा. पर्यत<br>दाखल ता. वेळ :-<br>दिनांक 28.02.2021 चे 03.42 | सरकार तर्फे :- सपोनि/विक्रांत सगणे नेम. स्थानिक गुन्हे शाखा पोलीस अधिक्षक कार्या. गडचिरोली<br>अटक आरोपीतांचे नाव :-<br>1. शाहबाज हमीद खान, वय-23 वर्षे, रा. झु पार्क, बहादुर पुरा, हैद्राबाद<br>2. अब्दुल अजीज अब्दुलरहु, वय-28वर्षे, रा गडचांदुर ता. राजुरा, जि. चंद्रपुर<br>3. करीम खॉन नबी खॉन, वय-३७ वर्षे, रा. कलगांव ता. दिग्रस, जि. यवतमाळ<br>4. आसीफ मोहसीन कुरेशी वय-27 वर्षे, रा. पीली नदी, नागपुर<br>5. मीर्झा मुजाहीद मुबारक बेग, वय-24 वषे, रा. प्मंडल जेन्नुर, जिल्हा आसीयाबाद, तेलंगाना ह.मु. लक्कडकोट, ता. राजुरा, जि. चंद्रपुर<br>6. मीर्झा गफफार अनवर बेग, वय-34 वर्ष, रा. उतनुर, जि. अदिलाबाद, तेलंगाना<br>7. शेख अस्लम शेख नवाज, वय-19 वर्षे, रा. किरामीरी, जि.आसीफाबाद तेलंगाना<br>8. लतीफ खान बाबु खान, वय-32 वर्ष, रा. इलीयासनगर, , जि. अदिलाबाद, तेलंगाना<br>9. राजु मदन पाल, वय-45 वषे, रा. यशोधरानगर, हनुमान मंदीराजवळ, नागपुर<br>10. राजेश हदयसिंग मडकाम, वय-25 वर्षे, रा. नेवसा, ता. बिछीया, जि. मंडला, मध्य प्रदेश<br>11. नामे कमलेश उर्फ पिंटु नत्थुलाल गुप्ता, वय-38 वर्षे, रा. नागपुर |
| **मिळुन आलेला मुद्देमाल** | १) किमंत :- **17,55,000/-**रुपये किमतीचे गोवंश (जनावरे) तसेच रेडे व म्हशी बेकायदेशिर रित्या वाहनांमध्ये कोबुन कत्तलीकरीता घेवुन जात असतांना मिळुन आलेले वेगवेगवळया किमंतीचे एकुन **141** जनावरे<br>२) किमंत **97,00000 /-** रुपये गोवंश, रेडे व म्हशीचे वाहतुकी करीता वापरण्यात आलेले वेगवेगळया कंपनीचे 5 मालवाहु वाहने<br>३) किमंत **1,13,000/-** रुपये घटना क्रमाचे दरम्यान आरोपीतांनी संपर्का करीता वापरलेले एकुन **10** मोबाईल अंगझडती दरम्यान मिळुन आलेले<br>अशा प्रकारे एकुन **1,15,68,000/-**रुपयाचा मुदे्माल | |

| गोपनिय बातमीदारा कडुन मिळालेल्या माहिती वरुन | पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी,सहा. पोलीस निरीक्षक विक्रांत सगणे, सोबत पोलीस अंमलदार दादाजी करकाडे, खुशाल गेडाम, किशोर इंगोले, धनंजय पत्रे, दादाजी करकाडे, भाऊराव बोरकर, नरेश सहारे, सत्यम लोहंबरे, निलकंठ पेंदाम, शुक्राचारी गवई, सुनील पुट्टावार, मानीक दुधबळे, मंगेश राऊत, मानीक निसार,विनोद बुरांडे, शेषराव नैताम, स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक, कार्या. गडचिरोली |
|---|---|

हैद्राराबाद, तेलगंणा आंतरराज्यातील काही मोठे व्यापारी हे गडचिरोली, जिल्हयातील तसेच सिमावर्ती भागातील स्थानिक शेतकऱ्यांकडील गुरे कत्तलीकरीता खरेदी करुन मालवाहु वाहनांमध्ये अपुऱ्या जागेत जबरदस्तीने कोंबुन दाटीवाटीने व निर्दयतेने वाहणात लोड करुन रात्रो दरम्यान कुरखेडा, वैरागड, ठाणेगाव मार्गे बेकायदेशिर वाहतुक करुन हैद्राराबाद, तेलगंणा राज्यात पोहचता करीत असल्याबाबत माहिती मिळाल्याने नमुद माहितीचे आधारे अशा प्रकारच्या बेकायदेशिर कृत्यास आळा बसविण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखा पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली यांनी त्यांचे स्तरावर गोपनिय बातमीदार नेमुन रेड संबधात नियोजन तयार केला.

स्था.गु.शा येथे कार्यरत असलेले सहायक पोलीस निरीक्षक विक्रांत अ. सगणे हे दिनांक 28.02.2021 रोजी कार्यालयात हजर असतांना सायंकाळचे सुमारास त्यांचे गोपनिय सुत्राकडुन मौजा कोरची, कोटरा जंगल भागात जमा करुन ठेवलेली जनावरे कत्तलीसाठी 5 आयशर कंटेनर तसेच मालवाहु ट्रक मध्ये निर्दयतेने जबरदस्तीने कोंबुन कत्तल करणाऱ्या व्यवसांयीकांना विक्री करण्याकरीता कोरची, पुराडा वैरागड मार्गे बेकायदेशिर वाहतुक करुन कत्तलीकरीता घेवुन जाणार असल्याबाबतची खात्रीशीर माहीती मिळाली त्याबाबत मा. श्री अंकित गोयल, पोलीस अधिक्षक, गडचिरोली मा. श्री. समिर शेख अपर पोलीस अधिक्षक, (प्रशासन) गडचिरोली यांना माहिती देवुन त्यांचे आदेशान्वये मा. पोलीस निरीक्षक श्री उल्हास भुसारी यांचे मार्गदर्शनाखाली व निर्देशाप्रमाणे वरील प्रमाणे नमुद पोलीस पथक दिनांक 28.02.2021 चे रात्रो 00.30 वाजता गडचिरोली येथुन रवाना होवुन सुरक्षीततेच्या दृष्टीकोणातुन वैरागड शिवारा ते ठाणेगाव रोड दरम्यान आप-आपले अस्तीत्व लपवुन नियोजनपुर्वक सापळा रचुन पोलीस पथक हा पाळत ठेवुन असतांना रात्रो 02.00 वाजता सुमारास गुप्त बातमीदाराने सेलफोन वरुन माहिती दिली की, नारींगी रंगाचे आयशर ट्रक क्र. एमएच 29 बीई 1582, भारत बेंझ कंपनीचा ट्रक क्रमांक एमएच 49 एटी 0568, अशोक लेलॅड कंपनीचा ट्रक क्रमांक टिएस 12 युसी 9768, अशोक लेलॅड कंपनीचा ट्रक क्रमांक एमएच 29 एएन 5786,टाटा कंपनीचे आयशर अल्ट्रा 1518 ट्रक क्रमांक एमएच 40 बीजी 9992,असे 5 ट्रक कुरखेडा- कढोली मार्गाने वैरागड कडे भरधाव वेगाने येत असल्याचे सांगीतले वरुन भरधाव येणारे वाहनाचे वेगावरुन त्यांचेवर संशय बळावल्याने नमुद पाचही वाहने पहाटे 02.45 वाजता सुमारास एकापाठोपाठ एक पोहचताच सर्व स्टाफ सह नममुद वाहनांना रोड दरम्यान थांबविण्यात आले असता, वाहनाचे मागील डाल्यात काही संशयास्पद हालचालीचा आवाज येत असल्याने नमुद वाहनांवर संशय बळावल्याने संबधीत वाहनावरील चालक तसेच सोबतचे सहकारी इसमांना ताब्यात घेवुन त्यांचे कडे विचारणा केली असता, पाळीव जनावरे लोड केली असल्याचे सांगीतल्याने पोलीस पथकाने स्वत: खातरजमा केली असता, वरील प्रमाणे मालवाहु वाहनाचे मागील डाल्यात अपुऱ्या जागेत गोंवशा जणावरे तसेच रेडे व म्हशींना दाटीवाटीने, त्यांचे पायांना दोरीने घट्ट बांधुन मालवाहु वाहनात जबरदस्तीने कोंबुन बेकायदेशिररित्या प्रवास करीत असतांना मिळुन आलेत.

नमुद मालवाहु वाहनांमध्ये कोंबुन भरण्यात आलेल्या गोवश जनावरे, रेडे, तसेच म्हशीच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने त्यांना लवकरात लवकर मालवाहु वाहनामधुन मोकळे करणेगरजेचे असल्याने नमुद मालवाहु वाहने, आरोपीतांसह मौजा गोठणगाव ता. कुरखेडा जिल्हा गडचिरोली येथील गोशाळे पोहचवुन नमुद वाहनांमध्ये दाटीवाटीने कोंबुन असलेले असे एकुन 141 गोवंश (जणावरे), रेडे व म्हशींना मोकळे करण्यात आले असुन संबधीत जनावरांना अत्यंत निर्दयतने बांधुन ट्रक मध्ये कोंबले असल्याने एकुन 5 गोवंश जनावरांच्या मृत्यु झाला.

अशा प्रकारे गोवंश जनावरे, वाहतुकी करीता वापरण्यात आलेली वाहने, तसेच संपर्का करीता वापरलेले मोबाईल्स असे एकुन 1,15,68,000/-रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन सदरची कायदेशिर प्रकिया पार पाडुन संबधीत वाहन चालक आरोपीता विरुध्द गुन्हा नोद करणे असल्याने ताब्यातील वरील नमुद इसमांना त्याचे ताब्यातील नमुद मालवाहु वाहनांसह पोलीस स्टेशन आरमोरी येथे हजर करुन नमुद फिर्यादी यांनी शासना तर्फे दिलेल्या लेखी तक्रारीवरुन पोलीस स्टेशन आरमोरी येथे गुन्हा नोद करण्यात आला आहे.


SHOT ON MI A1
MI DUAL CAMERA


SHOT ON MI A1
MI DUAL CAMERA

